N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** बुलढाणा
**P.S.(ठाणे):** नांदुरा
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0439
**Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 16/07/2024 23:16

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्हाची घटना):**
1. **Day(दिवस):** मंगळवार
**Time Period (कालावधी):** प्रहर 5
**Date From (दिनांक पासून):** 16/07/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 16/07/2024
**Time From (वेळेपासून):** 12:49 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:04 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 16/07/2024
**Time (वेळ):** 21:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 060
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 16/07/2024 23:04 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1. (a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 2 किमी
**Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** पंचायत समीती परीसर बांधकाम विभ,नांदुरा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** नांदुरा
**District(State) (जिल्हा(राज्य)):** बुलढाणा(महाराष्ट्र)

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री. प्रकाश गणेश डाबेराव

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1994

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | शेलगांव मुकुंद , नांदुरा,नांदुरा ,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | शेलगांव मुकुंद , नांदुरा,नांदुरा ,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8788203803

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | योगराज नागोराव राठोड | | | 1. बाहेकर नगर,दहीगांव रोड , नांदुरा,नान्दुरा ,बुलढाणा,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणाऱ्याकडुन तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 2000/ रुपये लाचेची मागणी | 2,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

2,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

शासकिय विश्रामगृह नांदुरा दिनांक 16.07.2024
श्री. प्रकाश गणेश डाबेराव, वय 30 वर्ष, व्यवसाय मजुरी, रा.शेलगांव मुकुंद ता. नांदुरा, जि. बुलढाणा
मी समक्ष टंकलिखीत फिर्याद देतो की, मी वरील प्रमाणे असून वर नमुद ठिकाणी पत्नी व मुलाबाळासह राहतो व मजुरीचे काम करतो. तसेच माझी आई नामे शोभाबाई गणेश डाबेराव ही माझ्यातून विभक्त राहते.
मी दिनांक 15.07.2024 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो बुलढाणा येथे जावून लेखी तक्रार नोंद केली की, सन 2021-22 मध्ये माझी आई शोभाबाई डाबेराव हिला व सन 2022-23 मध्ये मला शबरी आवास योजनेतून घरकुलाचे प्रस्ताव मंजुर झालेले आहेत. पंचायत समीती नांदुरा येथील संबधीत श्री. खेमराज राठोड साहेब यांनी माझा व माझ्या आईचे घरकुलाचा प्रस्ताव मंजुरीकरिता सादर केल्याचा मोबदला म्हणून यापुर्वी नगदी 11000/- रुपये व माह फेब्रुवारी 2024 मध्ये फोन पे द्वारे 3000/- रुपये घेतलेले आहेत. त्यानंतर माझे घरकुलाचे सर्व हप्ते मला प्राप्त झालेले असून त्यानुसार माझे घरकुलाचे बांधकाम पुर्ण झालेले आहे. दिनांक 15.07.2024 रोजी मी पंचायत समीती नांदुरा येथे आईचे घरकुलाचे कामासाठी गेलो असता त्यावेळी मला खेमराज राठोड यांनी माझे शबरी योजनेच्या घरकुलाचा प्रस्ताव मंजुरीकरिता पाठविल्याबाबतचा मोबदला म्हणून तसेच माझे आईच्या घरकुलाचा एक हप्ता बाकी असून तो मंजुर करुन देण्यासाठी पुन्हा 2000/- रुपये लाचेची मागणी करीत असल्याबाबत लेखी तक्रार दिली.
त्यावरुन दिनांक 15.07.2024 रोजी पोलीस उपअधिक्षक, श्रीमती घोगरे मॅडम यांनी जिल्हा क्षय रुग्णालय बुलढाणा यांचे कार्यालयातील दोन शासकीय कर्मचारी पंच म्हणुन उपलब्ध करुन घेवून सदर पंचाची व माझी आपसात ओळख करुन देवून मी दिलेली तक्रार पंचाना वाचावयास दिली. त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीवरुन लोकसेवक श्री. खेमराज राठोड, पंचायत समीती कार्यालय नांदुरा यांची लाच मागणी आहे काय? याबाबत लाच मागणी पडताळणी कार्यवाही करणे असल्याने त्याबाबत घोगरे मॅडम यांनी पडताळणी कार्यवाहीबाबत सुचना देवून व्हॉईस रेकॉर्डर बाबत सविस्तर माहिती दिली व त्याबाबत सविस्तर पडताळणी पुर्व पंचनामा करण्यात आला आहे.
त्यानंतर मी माझे मोटार सायकलने तसेच पोलीस उपअधिक्षक श्रीमती घोगरे मॅडम व सापळा पथक तसेच दोन्ही पंच असे सापळा कार्यवाही कामी लागणाऱ्या सर्व साहित्यासह शासकिय वाहनाने नांदुऱ्याकडे रवाना झालो, त्यानंतर मी व सापळा पथक असे नांदुरा शिवारात पोहचल्यानंतर श्रीमती घोगरे मॅडम यांनी मला व पंच क्र. 1 श्री. उघडे यांना पडताळणी पुर्व पंचनाम्यातील सुचनांची उजळणी करुन देवून दिलेल्या तक्रारीप्रमाणे लोकसेवक श्री. राठोड यांची लाच मागणी आहे किंवा कसे याबाबत पंचायत समीती कार्यालय नांदुरा येथे जावून त्याची भेट घेण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार घोगरे मॅडम यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन सदर व्हॉईस रेकॉर्डर नापोकॉ. लोखंडे यांचे करवी माझे शर्टाचे आतून बाहेरुन दिसणार नाही अश्याप्रकारे लटकावून दिले व पंच क्र. 1 श्री. उघडे यांचेसह माझे खाजगी मोटार सायकलने 16.26 वा. पंचायत समीती नांदुऱ्याकडे रवाना केले. त्यावेळी मी व पंच क्र.1 राजेंद्र उघडे असे आम्ही दोघे माझ्या खाजगी मोटार सायकलने पंचायत समीती कार्यालय नांदुरा येथे जावून राठोड साहेब यांची भेट घेवून त्यांचे घरकुलाचे कामासंबधाने वलगी केली असता, झालेल्या बोलणी दरम्यान लोकसेवक राठोड साहेब हे मला म्हणाले की, तुझ्याकडे किती बाकी आहे? दोन बाकी आहे न असे म्हणुन लोकसेवक श्री राठोड यांनी दोन हजार रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारण्यास संमती दिल्याने मी त्यांना उद्या घेवून येतो असे म्हणून आम्ही कारवाई पथकाजवळ परत आलो. त्यावेळी घोगरे मॅडम यांनी माझेत व लोकसेवक खेमराज राठोड यांचेत लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकून लोकसेवक राठोड यांनी माझेकडे 2000/- रुपये मागणी करुन लाच रक्कम उद्या दिनांक 16.07.2024 रोजी स्विकारणार असल्याबाबत खात्री केली व झालेल्या लाच मागणी पडताळणी कार्यवाहीबाबतचा सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आला आहे.
त्यानुसार सदर प्रकरणात दिनांक 16.07.2024 रोजी सापळा कार्यवाही आयोजित करणे असल्याने पोलीस

उपअधिक्षक श्रीमती धोगरे मॅडम, सापळा पथक, तसेच पंच असे आज रोजी नांदुरा येथे हजर आले. त्यावेळी धोगरे मॅडम यांनी मला लोकसेवक खेमराज राठोड यांचे लाच मागणी प्रमाणे त्यांना देण्यासाठी 2000/- रुपये हजर करण्यास सांगीतले असता मी माझेजवळील 500/- रुपये दराच्या भारतीय चलनातील 04 नोटा असे एकूण 2000/- रुपये धोगरे मॅडम यांचेकडे हजर केले. त्यावेळी धोगरे मॅडम यांनी सापळा पथकातील सदस्याचे मदतीने सदर नोटांचे क्रमांक लिहून घेवून त्या नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावण्याची प्रकिया पुर्ण करुन सदर लाच रक्कम माझे शर्टचे डाव्या बाजुच्या खिशात ठेवून देवून मला व पंचाना सापळा कार्यवाहीबाबत सविस्तर सुचना देवून त्याबाबतचा सविस्तर सापळा पुर्व पंचनामा करण्यात आला आहे. सापळा पुर्व पंचनाम्याची कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर सदर प्रकरणात सर्वानुमते पंचायत समीती कार्यालय नांदुरा येथे सापळा कार्यवाही आयोजित करण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार धोगरे मॅडम यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन नापोकॉ. लोखंडे यांचे करवी माझे गळ्यात लटकावून दिले. त्यानंतर मला व पंच क्र. 1 श्री. उघडे यांना माझी खाजगी मोटार सायकलने पंचायत समीती कार्यालय नांदुऱ्याकडे 12.49 वा. रवाना केले. त्यावेळी आमचे मागोमाग धोगरे मॅडम तसेच सापळा पथक व पंच क्र.2 माणिकलाल जैस्वाल असे शासकिय वाहनाने पंचायत समीती कार्यालय नांदुरा कडे रवाना झाले. त्यावेळी मी व पंच तसेच सापळा पथक असे पंचायत समीती कार्यालय नांदुऱ्याचे आवारात पोहचलो. त्यावेळी सापळा पथक सुध्दा आमचे पाठोपाठ पंचायत समीती कार्यालयाचे आवारात हजर आले. त्यावेळी मी व पंच क्र. 1 श्री. उघडे असे राठोड साहेब बसत असलेल्या खोलीमध्ये गेलो त्यावेळी राठोड साहेब यांनी हाताची बोटे हलवून लाच रक्कम देण्याबाबत इशारा केला असता, मी माझे उजव्या हाताने लाचेची रक्कम 2000/- रुपये काढून खेमराज राठोड यांचेसमोर धरली असता राठोड साहेब यांनी सदर लाच रक्कम त्यांचे डाव्या हाताने स्विकारुन स्वतःचे नेसत्या जिन्स पॅन्टचे डाव्या बाजुच्या समोरील खिशामध्ये ठेवून दिली. त्यावेळी मी त्यांना आईच्या घरकुलाचे शेवटचा हप्ता खात्यात जमा करण्याबाबत बोलणी केली व खोलीच्या दरवाज्यासमोर येवून हातातील मोटार सायकलची चाबी खाली टाकून ती परत उचलून लाच रक्कम स्विकारल्याबाबतचा इशारा केला असता पोलीस उपअधिक्षक श्रीमती धोगरे मॅडम व सापळा पथकातील सदस्य असे लोकसेवक खेमराज राठोड बसलेल्या खोलीत आले व त्यांनी लोकसेवक खेमराज राठोड यांना ताब्यात घेवून त्यांना त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव खेमराज नागोराव राठोड, वय 39 वर्ष, पद स्थापत्य अभियांत्रीकी सहायक, वर्ग 3, बांधकाम विभाग, पंचायत समीती कार्यालय नांदुरा, रा. प्लॉट क्र. 23, माला मंगल कार्यालयाजवळ, पार्वतीनगर, उमरसरा जुना यवतमाळ, ता. जि. यवतमाळ असे सांगीतले. त्यावेळी कारवाई पथकाने खेमराज राठोड यांना ताब्यात घेवून माझे व माझ्या आईच्या घरकुलाच्या योजनेच्या कागदपत्राविषयी विचारपुस केली असता लोकसेवक खेमराज राठोड यांनी सांगीतले की, तक्रारदार प्रकाश डाबेराव यांचे घरकुल हे शबरी आवास योजनेतुन मंजुर झालेले असून त्यांची आई शोभाबाई गणेश डाबेराव हिचे घरकुल हे पंतप्रधान आवास योजनेतुन मंजुर झालेले आहे. व सदर घरकुलांच्या रक्कमा ह्या लाभार्थ्यांचे खात्यात जमा करण्यात आल्या असल्याबाबत धोगरे मॅडम यांना माहिती दिली. त्यावेळी माझी खात्री झाली की, खेमराज राठोड हे मला माझे आईचे घरकुल हे शबरी आवास योजनेतून मंजुर असून त्याचा अजून एक हप्ता बाकी असल्याचे भासवून माझेकडे लाचेची मागणी करीत होते.

तरी आलोसे खेमराज राठोड, पद स्थापत्य अभियांत्रीकी सहायक, यांनी दिनांक 15.07.2024 रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान मला, माझे नावावर शबरी आवास योजनेतुन मंजुर झालेल्या घरकुलाचे योजनेचा प्रस्ताव मंजुरीकरिता सादर केल्याबाबतचा मोबदला म्हणून तसेच माझे आईचे घरकुलाचा शेवटचा हप्ता खात्यात जमा करण्याचे भासवून माझेकडे 2000/- रुपये लाचेची मागणी करुन दिनांक 16.07.2024 रोजी आयोजित करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान आलोसे खेमराज नागोराव राठोड, पद स्थापत्य अभियांत्रीकी सहायक यांनी बांधकाम विभाग, पंचायत समीती कार्यालय, नांदुरा येथे 12.49 ते 13.04 वा. दरम्यान माझेकडून 2000/- रुपये लाच रक्कम स्विकारुन गैरमार्गाने स्वतःचा आर्थिक गैरलाभ करुन घेतला असून त्यांचे विरुध्द माझी कायदेशिर फिर्याद आहे.

मी दिलेली फिर्याद संगणकावर टंकलिखित करण्यात आली. संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेल्या फिर्यादीच प्रिंट काढून ती मी वाचून पाहीली माझे सांगण्याप्रमाणे बरोबर आहे

कायमी
अप क्र 439 /2024 कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988
फिर्यादी - श्री. प्रकाश गणेश डाबेराव, वय 30 वर्षे, व्यवसाय मजुरी, रा.शेलगांव मुकुंद ता. नांदुरा, जि. बुलढाणा
मोक.- नाही
आरोपी - खेमराज नागोराव राठोड, वय 39 वर्ष, पद- स्थापत्य अभियांत्रीकी सहायक रा. बाहेकर नगर,दहीगांव रोड नांदुरा ता नांदुरा जि. बुलडाणा, व्यवसाय - नोकरी
घटनास्थळ - पंचायत समीती परीसर बांधकाम विभाग कार्यालय नांदुरा
घ ता वेळ - दिनाक 16/07/2024 चे 12/49 वा ते 13/04 वा. दरम्यान
हकीकत - अश्या प्रकारे आहे की नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी यांनी दिनांक 15.07.2024 रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान मला, माझे नावावर शबरी आवास योजनतुन मंजुर झालेल्या घरकुलाचे योजनेचा प्रस्ताव मंजुरीकरिता सादर केल्याबाबतचा मोबदला म्हणून तसेच माझे आईचे घरकुलाचा शेवटचा हप्ता खात्यात जमा करण्याचे भासवून माझेकडे 2000/- रुपये लाचेची मागणी करुन दिनांक 16.07.2024 रोजी आयोजित करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान आलोसे खेमराज नागोराव राठोड, पद स्थापत्य अभियांत्रीकी सहायक यांनी बांधकाम विभाग, पंचायत समीती कार्यालय, नांदुरा येथे 12.49 ते 13.04 वा. दरम्यान माझेकडून 2000/- रुपये लाच रक्कम स्विकारुन गैरमार्गाने स्वतःचा आर्थिक गैरलाभ करुन घेतला त्याचेविरुध्द फिर्यादी यांनी अँटी करप्शन ब्युरो बुलडाणा यांचेकडे दिलेल्या रिपोर्ट वरुन व मा.पोलीस उपअधिक्षक श्रीमती शितल घोगरे अँटी करप्शन ब्युरो बुलडाणा यांनी दिलेल्या लेखी पत्रान्वये मा पोनि नांदुरा यांचे आदेशाने आम्ही पोलीस स्टेशन क्र.न.288 नी सदरचा अप दाखल करुन पुढील तपास मा.पोलीस उपअधिक्षक श्रीमती शितल घोगरे अँटी करप्शन ब्युरो बुलडाणा हे करीत आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरुन अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

VILAS RAMESH PATIL(I (Inspector)) / POBN66039 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिकाऱ्याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणाऱ्याची सही/अंगठा):

प्रकाश रा. डाबेराव

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अंमलदार
पोलीस स्टेशन, नांदुरा

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): VILAS RAMESH PATI
**Rank**(पद): . (Inspector)
**No.**(सं.): POBN66039